भूमि विभागातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल महापार या <u>ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदविण्याबाबत..</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आस्था-२०१८/प्र.क्र.४९/ई-६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १४ मे, २०१८

<u>वाचा:</u> सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/१३, दिनांक १५.१२.२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१७-२०१८ पासून सर्व गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने "महापार (MAHAPAR)" या प्रणालीमध्ये नोंदविण्याचे प्रस्तावित असून, सदर प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत सेवेतील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांचे कार्यालयनिहाय युनिट (Organization Unit) निश्चित करुन, सदर प्रत्येक OU साठी प्राथमिक परिरक्षक (Primary Custodian) नियुक्ती करावी, तसेच सदर प्रत्येक Organization Unit मधील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी एका अतिरिक्त परिरक्षकाची (Alternate Custodian) ची नियुक्ती करावी आणि सदर अतिरिक्त परिरक्षकाच्या नियंत्रणाखालील एक किंवा अधिक कर्मचाऱ्यास पार व्यवस्थापक (PAR Manager) म्हणून घोषित करावे, अशा सूचना वाचा येथील परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या सदर सूचनांच्या अनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१७-२०१८ पासूनचे कार्यमुल्यमापन अहवाल "महापार" या ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदविण्यासाठी Organization Unit निश्चित करुन त्यासाठी प्राथमिक परिरक्षक, अतिरिक्त परिरक्षक व पार व्यवस्थापक नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

भूमि अभिलेख विभागातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१७-२०१८ पासूनचे कार्यमुल्यमापन अहवाल "महापार" या ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदविण्यासाठी खालील प्रमाणे Organization Unit निश्चित करुन त्यासाठी प्राथमिक परिरक्षक, अतिरिक्त परिरक्षक व पार व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात येत आहे :-

अ. क्र.	कार्यालयनिहाय युनिट (Organization Unit/O U)	प्राथमिक परिरक्षक (Primary Custodian)	अतिरिक्त परिरक्षक (Alternate Custodian)	पार व्यवस्थापक (PAR Manager)
०१	जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय	उप संचालक भूमि अभिलेख (सर्वसाधारण), संलग्न जमाबंदी आयुक्त, पुणे	कार्यालय अधिक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय	वरीष्ठ लिपीक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
०२	उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.	उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.	वरीष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
०३	उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे	उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे	वरीष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे .
०४	उप संचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक	उप संचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक	वरिष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक
०५	उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद	उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद	वरीष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद
०६	उप संचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती	उप संचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती	वरीष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती

०७	उप संचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर	उप संचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर	कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर	वरीष्ठ लिपीक, उप संचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०५१४१६१६०६४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2018.05.14 16:14:30 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,

प्रत : १) सर्व उप संचालक भूमि अभिलेख, (कोकण प्रदेश, मुंबई /पुणे प्रदेश, पुणे/ औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद/ नाशिक प्रदेश, नाशिक/ अमरावती प्रदेश, अमरावती/ नागपूर प्रदेश, नागपूर)
२) सर्व संबंधीत अधिकारी (द्वारा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म.रा.पुणे)
३) निवडनस्ती ई-६ कार्यासन, महसूल व वन विभाग.